# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०५ प्रस्ताव क्रमांक : २९ दिनांक :- १७/०२/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नेमणूक करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी आठ सदस्य दिनांक ०१/०२/२०२३ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २० (३) नुसार निवृत्त होणार आहेत. त्यांचे जागी नवीन सदस्य नेमणूक करावयाचे आहेत. यासंबंधी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये पुढील प्रमाणे तरतूदी आहेत.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २० स्थायी समितीची रचना:-**

(१) स्थायी समितीत १६ (सोळा) पालिका सदस्य असतील.

(२) महानगरपालिकेने सार्वत्रीक निवडणुकांनंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी सोळा व्यक्तिंची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे.

(३) स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील.

(४) पोट- कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोटकलम (३) मध्ये विर्निदिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यंत असतील ते निवृत्त होतील.

परंतू पुन्हा नेमण्यात आलेल्या सदस्याच्या बाबतीत,या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी त्याच्या पदाची मुदत त्याच्या फेरनेमणुकीच्या तारखेपासून मोजण्यात येईल.

(५) महानगरपालिकेने पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे.

(६) जो कोणताही पालिका सदस्य स्थायी समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल तो पुन्हा नेमला जाण्यास पात्र असेल.

तसेच या रिक्त पदांवर सदस्य नेमणुकीकरीताची पध्दती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३१ - अ मध्ये पुढील प्रमाणे नमुद केली आहे.

**३१-अ. प्रमाणशीर प्रतिनिधित्व देउन समित्यांवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे :-**

(१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमात किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी,

महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार पालिका सदस्यांचे नाम निर्देशन करून करण्यात येईल - मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो -

(अ) स्थायी समिती,

(ब) परिवहन समिती,

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती,

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती,

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

[परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील. ]

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ (१९८७ चा महा.२०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काहीही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २० (२) मध्ये नमुद केल्याप्रमाणे १६ सदस्य निवडीसाठी दिनांक २२/०२/२०१९ रोजी सभा झाली होती. मा.महासभा सूचना क्रमांक ८ प्रस्ताव क्रमांक ५५ दिनांक ११/०२/२०२२ मध्ये नविन आठ सदस्य नेमण्यांत आले आहेत. त्यानुसार आजमितीस जे १६ सदस्य स्थायी समितीमध्ये आहेत ते पुढील प्रमाणे --

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वाकळे कुमार बबनराव | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी,आघाडी |
| २ | पाउलबुधे विनीत नाथ | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी,आघाडी |
| ३ | गाडे (कर्डिले) ज्योती अमोल | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी,आघाडी |
| ४ | ननावरे गौरी गणेश | सदस्य, स्थायी समिती | भारतीय जनता पार्टी |
| ५ | कांबळे राहुल दादु | सदस्य, स्थायी समिती | भारतीय जनता पार्टी |
| ६ | कवडे उमेश (गणेश) खंडेराव | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| ७ | लोखंडे मंगल सुनिल | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| ८ | वारे रुपाली निखील | सदस्य, स्थायी समिती | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस |
| ९ | भाकरे रिता शैलेश | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| १० | गायकवाड परसराम बाळू | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| ११ | शिंदे सचिन चंद्रशेखर | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| १२ | चव्हाण मिना शिवाजी | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| १३ | खान समद वहाब | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| १४ | ताठे वंदना विलास | सदस्य, स्थायी समिती | भारतीय जनता पार्टी |
| १५ | बारस्कर रविंद्र रावसाहेब | सदस्य, स्थायी समिती | भारतीय जनता पार्टी |
| १६ | शेख मुदस्सर जहाँगीर | सदस्य, स्थायी समिती | बहुजन समाज पार्टी |

तसेच खालील आठ सदस्य हे दिनांक १/२/२०२३ रोजी दुपारी कलम २० (४) मधील तरतुदी प्रमाणे निवृत्त होत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | भाकरे रिता शैलेश | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| २ | गायकवाड परसराम बाळू | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| ३ | शिंदे सचिन चंद्रशेखर | सदस्य, स्थायी समिती | शिवसेना |
| ४ | चव्हाण मिना शिवाजी | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ५ | खान समद वहाब | सदस्य, स्थायी समिती | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ६ | ताठे वंदना विलास | सदस्य, स्थायी समिती | भारतीय जनता पार्टी |
| ७ | बारस्कर रविंद्र रावसाहेब | सदस्य, स्थायी समिती | भारतीय जनता पार्टी |
| ८ | शेख मुदस्सर जहाँगीर | सदस्य, स्थायी समिती | बहुजन समाज पार्टी |

या निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी नेमणुक करणे कामी कलम २० (५) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक केली पाहिजे.

तथापी वर उल्लेख केलेले निवृत्त झालेले सदस्य क.२० (६) नुसार पुन्हा नेमले जाण्यास पात्र असतील.

सदरची नेमणुक कलम ३१-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पक्षीय बलाबलाप्रमाणे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन करावयाची आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये एकुण सदस्य संख्या ६८ आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील पक्षनिहाय संख्याबळ काढतांना ६८ सदस्यांचा विचार करुन काढावा लागेल. ते पुढील प्रमाणे

**एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ १६ = ४.२५**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २३ | ÷ ४.२५ | ५.४१ | ५ | - | ५ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ | ÷ ४.२५ | ४.४७ | ४ | १ | ५ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १६ | ÷ ४.२५ | ३.७६ | ३ | १ | ४ |
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ | ÷ ४.२५ | १.१७ | १ | -- | १ |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ | ÷ ४.२५ | ०.९४ | -- | १ | १ |
| ६ | समाजवादी पार्टी | १ | ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| | एकुण | | | | १३ | ३ | १६ |

वरील तक्त्यांमधील तौलनिक संख्याबळाचा विचार करता तौलनिक संख्या बळाच्या पुर्णांक संख्येत कोणताही बदल झालेला दिसुन येत नाही. त्यामुळे जे सदस्य दिनांक ०१/०२/२०२१ रोजी स्थायी समिती मधुन निवृत्त झालेले आहेत त्यांचे जागी ते ज्या पक्षाचे / गटाचे सदस्य आहेत त्याच पक्षाचे / गटाचे सदस्य नियुक्त करणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी प्रमाणे पक्षीय बलाबला नुसार नविन ८ सदस्यांची नेमणुक करावी लागेल.

| **अ.क्र.** | **पक्ष /आघाडी /** | **नेमावयाच्या सदस्यांची संख्या** |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | २ सदस्य |
| २ | शिवसेना | ३ सदस्य |
| ३ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी | २ सदस्य |
| ४ | बहुजन समाज पार्टी | १ सदस्य |

तरी मा.स्थायी समितीचे दिनांक ०१/०२/२०२३ रोजी दुपारनंतर निवृत्त होणा-या, या अहवालामध्ये नमुद केलेल्या आठ सदस्यांचे जागी वर उल्लेख केलेल्या बलाबलानुसार मान्यता
प्राप्त पक्षाचे , नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन ८ सदस्य नामनिर्देशनाव्दारे स्थायी समितीवर नियमानुसार नेमणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, सद्यस्थितीत मा.विधानपरिषदेची आचार संहिता लागु आहे. तरी आदर्श आचार संहितेच्या अनुषंगाने सदर कार्यवाही बाबत आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करा.

यावर नगरसचिव श्री.एस.बी.तडवी यांचा सादर रिपोर्ट की, निवृत्त होणारे सदस्य निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीची नविन सदस्यांची नेमणुक केली पाहीजे अशी तरतुद आहे.

८ सदस्य हे १ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी निवृत्त होणार आहे् त्यामुळे आचारसंहिता असली तरी अधिनियमाच्या तरतुदीनुसार महासभेकडे जानेवारी महिन्यातच प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ व ब नुसार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणेसाठी आदर्श आचारसंहितेतील तरतुदीनुसार कार्यवाही करणेच्या अटीवर मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त डॉ.प्रदीप वि.पठारे साहेब, यांचा अभिप्राय की, अ व ब मध्ये प्रस्तावित केल्यानुसार तसेच आदर्श आचारसहितेचा भंग होणार नाही या अटीवर मान्यतेस्तव सादर.

यावर मा.डॉ.पंकज जावळे, आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस प्रस्ताव पाठवावा.

यावर दिनांक ०६/०२/२०२३ रोजी नगरसचिव विभागाकडुन फेरसादर रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी आठ सदस्य दिनांक ०१/०२/२०२३ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २० (३) नुसार निवृत्त झालेले आहेत. तसेच नाशिक पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता संपली आहे.

तरी मा.स्थायी समितीचे दिनांक ०१/०२/२०२३ रोजी दुपारनंतर निवृत्त होणा-या या अहवालामध्ये नमूद केलेल्या आठ सदस्यांचे जागी वर उल्लेख केलेल्या बलाबलानुसार मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन ८ सदस्य नामनिर्देशनाव्दारे स्थायी समितीवर नियमानुसार नेमणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त सा, यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त डॉ.प्रदीप वि.पठारे साहेब यांचा अभिप्राय की, अ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर मॅडम, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

--*--

**चर्चा :-**

**मा.महापौर मॅडम :-** मा.स्थायी समितीचे सभापती श्री.कुमारभाउ वाकळे यांनी कौटुंबिक कारणास्तव स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. तो मी मंजूर करीत आहे.

**नगरसचिव श्री.तडवी :-** संबंधित गटनेत्यांनी मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांचेकडेस बंद पाकिटामध्ये स्थायी समिती सदस्य म्हणुन नामनिर्देशनाचे बंद पाकिट देण्याचे करावे.

**मा.महापौर मॅडम :-** गटनेत्यांनी माझेकडेस बंदपाकिटात दिलेल्या पत्रातील स्थायी समिती सदस्यांची नांवे वाचून दाखविली.

--*--

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या आठ सदस्यांच्या जागी नविन आठ सदस्यांची नेमणूक विशेष सभेव्दारे करणे बाबतच्या सभेमध्ये सर्व पक्षाच्या मा.गटनेत्यांनी नामनिर्देशनाव्दारे सुचविलेल्या पुढील ८ सदस्यांची मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी विधीग्राहयरित्या नामनिर्देशनाव्दारे नेमणुक झाल्याचे मी घोषीत करीत आहे. तसेच मा.श्री.कुमार बबनराव वाकळे यांनी सभेमध्ये दिलेल्या पत्रानुसार त्यांचे रिक्त जागी अनुक्रमांक ९ बारस्कर संपत विजय यांची स्थायी समिती सदस्यपदी निवड झाल्याचे मी घोषीत करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | जाधव पल्लवी दत्तात्रय | भारतीय जनता पार्टी |
| २ | परदेशी प्रदिप अमरसिंग | भारतीय जनता पार्टी |
| ३ | सौ.कमल दत्तात्रय सप्रे | शिवसेना |
| ४ | सौ.सुवर्णा संजय गेनप्पा | शिवसेना |
| ५ | श्रीमती.सुनिता संजय कोतकर | शिवसेना |
| ६ | शेख मुदस्सर जहाँगीर | बहुजन समाज पार्टी |
| ७ | शेख नजीर अहमद अ. रज्जाक | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ८ | त्र्यंबके सुनिल नारायण | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |
| ९ | बारस्कर संपत विजय | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |

सुचक : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले

अनुमोदक : मा.श्री. उमेश (गणेश) खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.    जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.-    दिनांक : १३/०२/२०२३

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता होणा-या विशेष सभे बाबत...

प्रति,

१) श्री.शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
२) श्री.सुधाकर राउत, सामान्य प्रशासन विभाग,
३) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय,
४) श्री. बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
५) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता कार्यालय
६) श्री.प्रदीप निलाखे, महिला व बालकल्याण समिती कार्यालय,
७) श्री.राज चोटीले, सिक्युरिटी गार्ड
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी ९.३० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : १३/०२/२०२३

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा सुचना क्रमांक ०५ **शुक्रवार** दिनांक १७-०२-२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त (सा),
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. तसेच सदर सभेकरीता फोटोग्राफरची व्यवस्था करण्यांत यावी. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ५) | श्रीमती.मेघना निकम, नगरसचिव विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
---*---

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०५, शुक्रवार दि. १७/०२/२०२३ रोजीचा विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.-------------------------, | |
| २ | श्री.-------------------------, | |
| ३ | श्री.-------------------------, | |
| ४ | श्री.-------------------------, | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

नगरसचिव विभाग.- दिनांक : /०२/२०२३.

विषय : शुक्रवार दिनांक - १७ / ०२ /२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०५ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ५ शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.४७०/- (अक्षरी रक्कम रुपये चारशे सत्तर फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या * **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती आठ सदस्यांची निवड करणेकामी मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली मा.विशेष सभा **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रति,
मा.महापौर साहेब,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

विषय : स्थायी समिती सदस्यपदाचा राजीनामा देणे बाबत...

महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, मी सद्य स्थितीत स्थायी समिती सदस्य असुन सभापती या पदावर कार्यरत आहे. माझ्या कौटुंबिक अडचणीमुळे मला स्थायी समिती सदस्य म्हणुन काम करणे शक्य नाही.

तरी मी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ नुसार मी स्वखुशीने कोणाच्याही दबावाला बळी न पडता आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा देत आहे. तरी सदरचा राजीनामा मंजूर करण्यांत यावा हि विनंती.

आपला विश्वासु,

(कुमार बबनराव वाकळे)
सदस्य,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
प्रत : मा.गटनेता, नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
प्रत : नगरसचिव, नगरसचिव विभाग, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.